महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

डॉ.मधुकर शि.पवार
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यु) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com

**परिपत्रक क्रं.८** जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/मार्गदर्शन/5066-483/१५
दिनांक:- 2/6/२०१५

प्रति,

१) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

३) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- जन्म प्रमाणपत्रावर दत्तक विधान झाल्याची कोर्ट ऑर्डर डेट व कोर्ट ऑर्डरचा क्रमांक याचा शेरा रकान्यामध्ये उल्लेख न करणेबाबत.

संदर्भ :- १. साकार संस्था, औरंगाबाद यांचे पत्र क्रं.जा.क्रं.साकार/३१/२०१५-१६, दिनांक ११/०५/२०१५.
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.आमाजिआ/कक्ष-८ ३/दत्तक विधान/६७५९-७०५ दिनांक ०५ सप्टेंबर २०१४.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रं. २ अन्वये या कार्यालयाने मा.महानिबंधक, जन्म-मृत्यू, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी-दिल्ली यांचे पत्रान्वये दत्तक घेतलेल्या बालकाची जन्माची नोंद करण्यासाठी न्यायालयाच्या आदेशा बरोबरच दत्तक विधान (ॲडोपशन डिड) घेणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

दत्तक घेतलेल्या बालकाची नोंद करताना शेरा रकान्यात न्यायालयीन आदेशाची क्रमांक व तारीख इ. माहिती नमूद करणे आवश्यक आहे. त्यानंतर दत्तक घेतलेल्या आई-वडीलांच्या नावाने नवीन सुधारीत जन्म प्रमाणपत्र अदा करावे.

केंद्रिय दत्तक ग्रहण संसाधन प्राधिकरण भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालय अंतर्गत नवी-दिल्ली याच्या मार्गदर्शक तत्वानुसार दत्तक घेतलेल्या बालकाचे जन्म प्रमाणपत्रावर दत्तक असल्याचा तसेच कोर्ट आदेश इ.बाबींचा शेरा रकान्यात अथवा इतरत्र उल्लेख केला जाणार नाही याची कृपया दक्षता घ्यावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत माहितीसाठी -
श्री. विजय राजाळे, व्यवस्थापक/समाज कार्यकर्ता, साकार संस्था, औरंगाबाद.
प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीस्तव -
आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू औरंगाबाद महानगपालिका, औरंगाबाद.
प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी -
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, जिल्हा परिषद ..... (सर्व)
/- आपल्या अधिपत्याखाली सर्व निबंधक जन्म-मृत्यू यांना दत्तक गेलेल्या बालकाचे जन्म प्रमाणपत्रावर दत्तक विधान व कोर्ट ऑर्डर याची नोंद शेरा रकान्यात घेण्यात येऊ नये. अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना परिपत्रकाव्दारे कळविण्यात यावे. व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास अवगत करावा.
प्रत - उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)
प्रत सविनय सादर -
मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.